क्रमांक : १०६५१ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २१ जुलै, २०२०

**संदर्भ :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भनिनि-२०१९/प्र.क्र.६१/का.२४, दि.११ जून, २०२०

**:: परिपत्रक ::**

महालेखापाल कार्यालयाकडून सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधीची शिल्लक रक्कम मोबाईलवर SMS द्वारे दरमहा कळविण्यात येते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या अ, ब व क गटातील अधिकारी व कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे महालेखापाल कार्यालय, मुंबई व नागपूर कार्यालयाकडून प्रिंट काढून पुरविण्याची पद्धत सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षापासून बंद करण्यात येत आहे. महालेखापाल कार्यालयाच्या वेबसाईटवरुन संकेतस्थळ (agmaha.cag.gov.in) सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना आपल्या भविष्य निर्वाह निधीच्या तपशीलाचे लेखे प्रिंट काढून घेता येतील.

अ, ब व क गटातील अधिकारी व कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधीची अंतिम प्रदानाची सेवानिवृत्त/ मृत्यू प्रकरणातील विवरणपत्रे पूर्वीप्रमाणे महालेखापाल मुंबई/ नागपूर कार्यालयाकडून पुरविण्यात येतील.

अधिकारी/ कर्मचारी यांनी भविष्य निर्वाह निधीमधून अग्रिम/ ना-परतावा रकमेची मागणी केल्यास ती मंजूर करताना सादर करण्यात आलेले विवरणपत्र लेखे अचूक असल्याची खातरजमा रोखशाखेकडून करुन घेऊन नंतरच मंजूरीचे आदेश निर्गमित करण्याची दक्षता घ्यावी.

रोखशाखेमार्फत सादर करण्यात येणाऱ्या देयकांसोबत अधिकारी/ कर्मचारी यांनी ऑनलाईन सादर केलेली भविष्य निर्वाह निधीच्या विवरणपत्र लेखे अचूक असल्याची खातरजमा रोखशाखेकडून करुन घेऊन नंतरच मंजूरीचे आदेश निर्गमित करण्याची दक्षता घ्यावी.

आदेशानुसार,

(पूनम ढगे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
२) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
३) मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून)
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
६) संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी